MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता

Issue-37, Vol-09, Jan. to March 2021
International Peer Reviewed Refereed Research Journal

Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalay
Purna (Jn.) Dist.Parbhani

27) शिवकालीन कृषीव्यवस्था व उपाय योजना
प्रा.डॉ. एस.जी. शिंदे, औंढा नागनाथ ||110

28) अशोक कोळी यांच्या 'उलंगवाडी' कथासंग्रहातील समाजव्यवस्था : एक ...
प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते & पालचेवार पोतन्ना गंगन्ना, नांदेड ||112

29) हिमांशु जोशी की कहानियों में चित्रित समस्याएँ
जयदीप एन.वेगड, राजकोट (गुजरात) ||115

30) दिव्यांग चित्रकारों की कलात्मक प्रतिभा — एक अध्ययन
डॉ. कुमकुम भारद्वाज, इंदौर ||119

31) विनोबा भावे की चिन्तन–धारा
डॉ. विनीता कुमारी, समस्तीपुर ||123

32) वैश्वीकरण और खादी ग्रामोद्योग प्रगति : एक चुनौती
डॉ. पुष्पा बुटोलिया, दौसा, राजस्थान ||129

33) सर्वेश्वर दयाल सक्सेना के नाटकों का भाषागत सौंदर्य
दिप्ती के.छैया, राजकोट (गुजरात) ||136

34) भारतीय समाज और श्रम
डॉ. अमित कुमार दीक्षित, कोलकाता पश्चिम बंगाल ||140

35) सनगाड़ स्थित नौलिंग मन्दिर (इतिहास की मौखिक परम्परा पर आधारित)
श्रीमती हेमलता & डॉ० अवनीन्द्र कुमार जोशी, द्वाराहाट (अल्मोड़ा) ||143

36) जनमत निर्माण में जनसंचार माध्यमों की भूमिका : ग्रामीण एवं नगरीय युवाओं ...
सौरभ मौर्या, अयोध्या, उत्तर प्रदेश, भारत ||148

37) आत्मनिर्भर भारत अभियान
प्रो. सीमा नागर, धार (म.प्र.) ||155

38) सार्त्र और मार्क्सवाद : एक समीक्षात्मक अध्ययन
श्याम रंजन पाण्डेय, हजारीबाग, झारखण्ड ||158

39) शिक्षा : सामाजिक सुरक्षा
देवेन्द्र कुमार पाठक, महराजगंज, उ० प्र० ||161

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Co-ordinator IQAC
Estd. 1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

महाराष्ट्र, अल्फा पब्लिकेशन, नांदेड.

४. प्रा. का.रा. रडे / प्रा. श्रिया चौधरी, मराठ्याचा इतिहास, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव.

५. डॉ. कुलकर्णी अ.रा. शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन पुणे.

६. राजवाडे वि.का. (संपा) मराठ्याचा इतिहासाची साधने, भा.इ.सं. मंडळ, पुणे.

७. बेंद्रे वा.सी. - शिवाजी महाराजांचे चिकित्सक चरित्र भाग १ व २

८. केरसकर - छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र.

९. आचार्य धनंजय - मराठी सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

□□□

**28**

# अशोक कोळी यांच्या 'उलंगवाडी' कथासंग्रहातील समजाव्यवस्था : एक समाजशास्त्रीय अध्ययन

प्रा. डॉ. राजीव वैजनाथराव यशवंते
मराठी विभाग,
श्री. गुरु बुध्दीस्वामी महाविद्यालय, पूर्णा (जं),
जि. परभणी

पालंचेवार पोतन्ना गंगन्ना
भाषा, वाङ्मय आणि संस्कृती अभ्यास,
संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड

**********

प्रस्तावना:

आज खेडी बदलली आहेत, बदलत आहेत. भौतिकदृष्ट्या तर खेड्यात खूप बदल झाला आहे. लोकशाही समाजव्यवस्थेने तर तेथील परंपरागत ग्रामीण समाजव्यवस्थेला खूप बदलून टाकले आहे. परंपरागत जातीच्या आधारावर असलेली गावगाड्यातून प्रकट होणारी ग्रामव्यवस्था, तेथील अर्थव्यवस्था मोडून टाकली आहे. विज्ञानाच्या रेट्यामुळे शेतीत आता यंत्राचा वापर नविन राहिलेला नाही.

घरातही चिमण्या, दिवे, कंदिल यांची जागा विजेच्या दिव्यांनी घेतला आहे. भल्या पहाटेची घरातल्या जात्यांची घरघर थांबलेली आहे. पाणवठ्यावर गर्दी आता दिसत नाही, त्याची जागा आता घरातल्या नळांनी घेतला आहे.

गावातील चावडीची जागा ग्रामपंचायतीने घेतली आहे. गावातल्या कच्च्या विटांची, धाब्याची, माळवदाची आणि चिरेबंदी वाड्याची जागा आता सिमेंटची घरे घेत आहेत. पान टप—या, हॉटेल्स खेड्यातही दिसू लागल्या आहेत. शाळा, ग्रामीण आरोग्य केंद्र यामुळे गावात



Co-ordinator

सरकारी माणसे दिसू लागली आहेत. असे असले तरी ज्या झपाट्याने गावातील परिस्थिती बदलली आहे, त्या झपाट्याने लोकांच्या विचारात मात्र बदल झाल्याचे दिसत नाही. डॉ. वासुदेव मुलाटे अशोक कोळी यांच्या कथेतील समाजव्यवस्थेविषयी बोलताना म्हणतात, "अशोक कौतिक कोळी यांच्या कथेत पाटील, देशमुखांच्या माध्यमांतून चालणारी सामंतशाही गावांतर्गत असणारी अर्थार्जनाची साखळी, प्रसंगानूरूप निर्माण होणाऱ्या तंटाबखेड्यांचा न्यायनिवाडा करणारी गावातील पंचमंडळी, शेतकऱ्यांचे शोषण करणारे व्यापारी वर्ग, वर्षानुवर्ष राजकारणात असणारे गावातील प्रतिष्ठित आहेत."[१] यावरून असे म्हणता येईल की, शेतकऱ्यांचे शोषण करणारे, शेतकऱ्यांच्या वाईट अवस्थेला कारणीभूत असणारे दुसरे तिसरे कोणी नसून, ते गावातीलच प्रतिष्ठित समजले जाणारे लोकं आहेत. हे प्रतिष्ठित मंडळी गावातील निरक्षरतेचा फायदा घेताना दिसतात. एकीकडे काबाडकष्ट करूनही शेतकऱ्यांना, मजुरदारांना पोटभर अन्न मिळत नाही तर दुसरीकडे कामधंदा न करताही मजेत जीवन जगणारे व्यापारी, सावकार, राजकारणी कथेत सर्वत्र दिसतात. या समाजव्यवस्थेचाच अभ्यास या शोध पत्रिकेत करण्याचा प्रयत्न करण्यात आले आहे.

**विषय विवेचन :**

अशोक कोळी यांनी राजकारणातील, समाजकारणातील धूर्त लोकांचे संधीसाधूपणा 'उलंगवाडी' या कथासंग्रहातून समाजासमोर आणले आहे. 'लागवड', 'टेपीचा कोना', 'मिरवणूक', 'टकुरे', 'करजमुक्ती', 'सापाचं पिल्लू' या कथांतून आपले राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी राजकरणी कोणत्याही थराला जातात. गावात एकही शासकीय योजना राबविला जात नाही. शासकीय योजना आणण्यासाठी म्हणून 'भाऊ' कुटनितीने पंचायत समितीवर निवडून जातो. निवडणूक संपल्यावर मात्र तो गावाच्या विकासासाठी काहीच करत नाही. गावातील सर्व कामे आपल्या मनाप्रमाणे घडावे असे राजकारण्याना वाटत असते. तसे न घडल्यास त्यास कारणीभूत असणाऱ्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकरणांत गोवून त्रास दिला जातो. 'टोपीचा कोना' या कथेतल्या मुख्याध्यापकासोबत असेच घडते. झेंडावंदनाच्या दिवशी मुख्याध्यापक गावातील सर्वांना शाळेत बोलावतो. त्यात विद्यमान सरपंच व जिल्हा परिषद सदस्य हे दोघे असतात. सरपंच हा ग्रामशिक्षण समितीचा अध्यक्ष असल्याने झेंडा त्याच्या हातून फडकवले जाते. याचा राग मनात ठेवून जिल्हा परिषद सदस्य मुख्याध्यापकाला गावातीलच एका बाईच्या प्रकरणात गोवून मार खायायला लावतो. समाजात असे असंख्य प्रकरणे पहायला मिळतात.

निवडणूक जिंकण्यासाठी राजकारण्यांकडून अनेक मार्गाचा अवलंब केला जातो. कार्यकर्त्यांना त्या गोष्टीचा सुगावाही नसतो. आमदारकीच्या निवडणूकीत 'दादुशेठ' चांदिच्या मुद्रा वाटतो व निवडून आल्यावर सोन्याचे मुद्रा देणार असल्याचे पुडी सोडतो. एके दिवशी 'दादुशेठ' आणि 'वामनशेठ' यांच्यात बंद खोलीत चर्चा होते आणि संपूर्ण गावाचा मतदान दादुशेठला द्यायचे वामनशेठ एकटाच ठरवून मोकळा होतो. बाहेर थांबलेले गावकरी मात्र शांतपणे आपापल्या घरी निघून जातात. तर 'सापाचं पिल्लू' या कथेत त्या–त्या समाजातील महापुरूषांचे पुतळे बांधून देण्याचे आश्वासन बापूसाहेब देतो. निवडून आल्यावर मात्र ते सर्व विसरून राज्य करतो. ज्या ज्या वेळी मतदान येते त्या त्या वेळी कोणत्या समाजातील महापुरूषांचा पुतळा अगोदर बसवायचा हे ठरवले काय/असा प्रश्न विचारून त्यांच्यात वाद निर्माण करून आपली राजकीय पोळी तो भाजून घ्यायचा. आपली बापूसाहेबाकडून फसवणूक होत असल्याचे मात्र कोणाच्याच लक्ष्यात आले नाही. याचा गैरफायदा बापूसाहेब दर निवडणूकीच्या वेळी करून घेत होता. समाजातील अशिक्षितपणाचा फायदा राजकीय नेतेमंडळी घेत असल्याचे 'उलंगवाडी' कथासंग्रहातील अनेक कथामधून दिसून येते. या कथासंग्रहातील कोणत्याच कथांमध्ये प्रामाणिक राजकारणी लोकांच्या भल्यासाठी काम करत असलेला दिसून येत नाही.

निवडणूक जिंकल्यानंतर मिरवणूक काढली जाते त्यातील अभद्रता 'मिरवणूक' या कथेत आहे. गावस्तरावर गरीब लोकांना स्वंयपूर्ण बनवण्यासाठी शासन अनेक योजना राबवत असते. त्या योजना गरीबापर्यंत पोहोचावी अशी अपेक्षा शासनाची असते.



Co-ordinator
PRINCIPAL
Shri Guru Buddhi...

परंतू त्या अपेक्षा फोल ठरताना दिसतात. गावातील सुशिक्षित, राजकारणी त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचू देत नाहीत. 'निरधार', 'उभारी' या कथांमध्ये याचा प्रत्यय येतो. बाबुराव आण्णा, व शेंडे मास्तर हे असेच शासकीय योजनांचा फायदा स्वत: लाटतात. ज्यांच्यासाठी हे योजना असतात त्यांना या योजनांचा सुगावाही लागू देत नाहीत. योजनाबाबत खऱ्या लाभार्थींना कोणत्याही प्रकारचा मार्गदर्शन करत नाहीत. अधिकाऱ्यांना हाताशी धरून त्या योजना आपल्या पदरात पाडून घेताना दिसतात. यामुळे खरे लाभार्थी यापासून वंचित राहत असल्याचे दिसून येते. सरकारी अधिकाऱ्यांची या योजना खऱ्या लाभार्थीपर्यंत पोहचवण्याची धडपड कमी पडत असल्याचे दिसून येते.

'धुराळा', 'भरारी' या कथांमधून नातेसबंधातील फोलपणा आपल्याला दिसून येते. नातेसंबंध एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच असते. त्यापुढे स्वार्थ आणि स्वार्थच असते हेच वरील कथेत सांगण्याचा प्रयत्न अशोक कोळी यांनी केला आहे. गावातील गरीब, असहाय्य लोकांचा गावातील धनाढ्य व दलाल लोकं गैरफायदा घेऊन त्यांचे शारिरीक शोषण करतात. सुनंदा, सारजा, साधना यांच्या बाबतीत 'कडी', 'परकरन', 'टेपन' या कथांमध्ये असेच घडलेले आहे. त्यांचे जवळचे असणारेच त्यांचे शारीरीक शोषण केल्याचे दिसते. शारिरीक शोषण करणारे बहुतांशवेळा आपल्याच जवळचे असतात. या मताला इथे पुष्टी मिळते.

'वावर' कथेतून समाजा–समाजातील वाईट प्रवत्ती रघूभूच्या माध्यमांतून समोर आलेले आहे. तर स्वातंत्र्यानंतरही मागासवर्गीय शिक्षकांबाबतीत ग्रामीण भागातील लोकांची मानसिकता 'शाळेची वाट' या कथामधून दिसून येते. गावाचा सरपंच आणि मुख्याध्यापक यांच्यातील संवादावरून त्याची प्रचिती येते.

"काय नाव सांगलं नवाड्या मास्तरचं, गुरूजी/"
"गौतम खंडू निकम !"
"निकम?"
"हाव ! निकम."
"निकम म्हणजे ?"
" .................... ?"
"मागास वरगीय का ?"
"हाव !"
"जगन्याऽऽऽ"
"—जी सरकार/"
"फिर मांघी !"

जी सरदार!"[२] यावरून आजही सुशिक्षित असो, लोकप्रतिनिधी असो, यांच्या मनात मागासवर्गीयाविषयी घृणा असल्याचे दिसते.

उलंगवाडी' या कथासंग्रहातील सर्व कथा एकंदरीत आपल्या समाजातील विषम समाजव्यवस्थेचे दर्शन घडवतात. या कथांमध्ये राजकारणातील संधीसाधूपणा, शोषणवृत्ती, नातेसबंधातला बेगडीपणा हे प्रकर्षाने जाणवते.

अशोक कोळी यांच्या कथेतील ग्रामीण समाजजीवन विविधांगी आहे. अंधश्रध्दा, शेतकरीवर्ग, श्रमजीवी वर्ग, शोषण झालेला वर्ग, प्रस्थापित वर्गाने बसवलेली दहशत, भ्रष्टाचार, प्रामाणिक व्यक्तींची ससेहोलपट, नेत्यांचा स्वार्थी दृष्टीकोण या व्यक्तिंच्या वृत्ती प्रवृत्तीमुळे परंपरा जपणे, जातीविषमता यामुळे कथेतील समाजजीवन अस्वस्थ करते. अशोक कोळींनी खोलात जाऊन ग्रामीण समाजजीवणाचे चित्रण कथेतून केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतील समाजजीवन वाचकांना अंतर्मुख करते. ग्रामीण समाजातील दु:ख, दारिद्र्य, दुष्काळ, राजकारण, भ्रष्टाचार, अंधश्रध्दा यामुळे त्यांच्या कथेतील समाजजीवन लक्षवेधक झाले आहे. त्यांनी समाजजीवनातील विविध स्तरांचे 'उलंगवाडी' या कथासंग्रहातून दर्शन घडविलेले आहे .

**निष्कर्ष :**

१) या कथासंग्रहातील कथांमधून पूर्व खानदेशातील अस्सल प्रादेशिक बोलीतून तेथील ग्रामजीवन व्यक्त होते.

२) यातून शेतकरी, मजूरदार यांचा जीवन संघर्ष, त्यांच्या जीवनातील वास्तविक परिस्थिती दिसून येते.

३) या कथासंग्रहातील विविध कथांमधून भेटणारे स्वार्थी पुढारी, भ्रष्ट अधिकारी, निर्दयी सावकार, शोषक व्यापारी हे सर्वजण म्हणजे जणू काळ्या–कसदार



Co-ordinator
IQAC
Mahavidyalaya

सुपीक जमीनीला नापीक करणारी हरळी कुंध्याची बेटे आहेत असेच वाटते.

४) यातील सर्व कथा ग्रामीण जीवनाच्या समकालीन जाणीवेने साकार साकार झाल्या आहेत.

५) या कथासंग्रहातील सर्व कथा या छोटेखानी, वास्तविक, सुटसुटीत व वाचनीय आहेत.

६) उत्कंठा, उकल, विस्मय, हुरहुर, प्रारंभ–शेवट हे कथालेखनाचे घटक यात अजिबात कुठेच दिसत नाहीत. यामुळे त्या वास्तविक वाटतात.

७) यातील निवेदन सरळ–साधे, गोष्टीरूप, तृतीय पुरुषी आणि संवादात्मक आहे.

८) यातील लेखकाची संवादशैली वास्तवदर्शी, हृदयस्पर्शी आहे तर निवेदनशैली सरधोपट पण थेट काळजाला भिडणारी आहे.

९) पात्रे, घटना, वातावरण, निवेदन, भाषा तसेच कथार्थ या साऱ्यांची एकात्म प्रचिती ही या कथांमध्ये दिसून येते.

१०) कथा वाचत असताना कथानिवेदक मध्येमध्ये लुडबुड करत असल्याचे कुठेच जाणवत नाही.

संदर्भसुची :

१. अशोक कौतिक कोळी : 'कूड', प्रस्तावना, डॉ. वासुदेव मुलाटे.

२. अशोक कौतिक कोळी : 'शाळेची वाट', (उलंगवाडी), प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्र. आ. २६ जानेवारी २०१८

❑❑❑

29

# हिमांशु जोशी की कहानियों में चित्रित समस्याएँ

जयदीप एन.बेगड
(M.A., MPhil.), पीएच.डी. शोधछात्र,
हिन्दी भवन, सौराष्ट्र विश्वविद्यालय, राजकोट (गुजरात)

साहित्य और समाज का संबंध अटूट होता है। समाज की विसंगतियों का दिन-प्रति-दिन होनेवाली घटनाएँ और उनके बिच व्यक्ति समाज में रहकर जीवन यापन करता रहता है, उसका वास्तविक चित्रण हमें साहित्य में दिखाई देता है। साहित्यकार समाज में घटित घटनाओं को अपनी लेखनी द्वारा साहित्य में उजागर करने का प्रयास करता ही रहता है। समय परिवर्तन होने के कारण व्यक्ति या समाज समस्याओं के चक्रव्यूह में फँस जाता है। इन्हीं समस्याओं के कारण मनुष्य की एक दूसरे के प्रति आत्मीयता एवं आस्था भी नष्ट हो जाती है। हम भारतीय समाज जीवन पर नज़र डाले तो स्पष्ट दिखाई देता है कि औद्योगीकरण एवं बढ़ती आबादी के कारण समस्याओं का प्रबल रूप सामने आने लगा है। यहाँ हम हिमांशु जोशी जी की कहानियों में चित्रित समस्याओं पर संक्षेप में दृष्टिपात करेंगे–

## (१) पारिवारिक समस्या :

भारतीय संस्कृति में समाज तथा परिवार में व्यक्ति का महत्त्वपूर्ण स्थान रहा है। परिवार में माता–पिता, भाई–बहन आदि का विशेष स्थान होता है। आज वैज्ञानिकयुग तथा आर्थिक विषमता के कारण पारिवारिक जीवन संत्रस्त बनता जा रहा है। जिससे परिवार विघटन हो रहा है। हिमांशु जोशी जी की 'नंगे पाँवो के निशान' (प्रेत–पर्व) कहानी में संयुक्त परिवार का चित्रण हुआ है। नायक डिकरदेव का पिता डिकरदेव की पत्नी से यौन संबंध रखता है। जिससे बहु गोपुलि गर्भवती हो जाती है। समाज के डर से डिकरदेव के पिता आत्महत्या कर लेता है। गोपुलि पर सास और देवर कलंकिनी होने का आरोप लगाते हैं। गोपुलि को नेपाल के जंगल में छोड़ देने को कहती



Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn) Dist. ...